**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीत बहुतेक ठिकाणी भाजपा आघाडीवर

- मुंबईत ठाकरे बंधू तर पुणे आणि पिंपरी चिंचवड मधे पवार कुटुंबियांचे पक्ष पिछाडीवर

- लातूरमधे काँग्रेस- वंचित बहुजन आघाडी, वसई- विरारमधे बहुजन विकास आघाड़ी तर मालेगावमधे इस्लाम पार्टीला यश

**आणि**

- स्टार्ट अप अभियानानं गेल्या १० वर्षांमधे क्रांती घडवून आणली असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

**<><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिका निवडणुकीसाठीच्या मतमोजणीला आज सकाळी दहा वाजता सुरुवात झाली. सर्व महानगरपालिकांचे कल समोर येत असून काही ठिकाणी निकाल स्पष्ट झाले आहेत. निवडणूक आयोगाची अधिकृत आकडेवारी जाहीर झाली नसली तरी मतमोजणी केंद्रावरुन थेट मिळालेल्या माहितीनुसार बहुतेक ठिकाणी भाजपाला आघाडी मिळाल्याचं दिसतं.

**<><><><><>**

आतापर्यंत आलेल्या निकाल आणि कलानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेत भाजपा आणि शिवसेना युतीला निर्णायक आघाडी मिळताना दिसत आहे. शिवसेना भाजपा युती ११९ जागांवर आघाडीवर आहे, यात भाजपा ८८ तर शिवसेना ३१ जागांवर आघाडीवर आहे. दुसरीकडे उद्धव ठाकरे यांचा पक्ष ६४ जागांवर तर राज ठाकरे यांचा पक्ष केवळ सहा जागांवर आघाडीवर आहे. त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेवर भाजप आणि शिवसेना युती सत्ता स्थापन करणार हे जवळपास निश्चित झालं आहे.

**ठाणे** महानगरपालिकेत शिवसेना २४, भाजपा ५, राष्ट्रवादी काँग्रेस ४, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष ४, एमआयएम ५ जागांवर विजयी झाले आहेत. तर शिवसेनेचे

१९, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ६, राष्ट्रवादी काँग्रेसचे ६, भाजपाचे दोन, एमआयएमचा एक उमेदवार आघाडीवर आहे.

**नवी मुंबई**मधे भाजपा ७२, शिवसेना २७, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष दोन जागेवर आघाडीवर आहे.

**वसई विरारमधे** बहुजन विकास आघाडीचे ६३ उमेदवार आतापर्यंत विजयी झाले आहेत. तर भाजपाचे २४ उमेदवार विजयी झाले आहेत.

**पनवेल** महानगरपालिका निवडणुकीत भाजपाचे ३१ उमेदवार विजयी झाले आहेत. काँग्रेसचे चार, शिवसेनेचे दोन, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सहा तर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रत्येकी एक उमेदवार विजयी झाले आहेत.

**भिवंडीत** कोणार्क विकास आघाडीचे चारही उमेदवार विजयी झाले आहेत.

**उल्हासनगर** मधे भाजपाचे १९, शिवसेनेचे १६, वंचित बहुजन आघाडीचे दोन, आणि काँग्रेस आणि मनसेचे प्रत्येकी एक उमेदवार विजयी झाले आहेत.

**कल्याण** डोंबिवलीमधे भाजपा २८, शिवसेना २८, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष दोन, मनसे चार जागांवर आघाडीवर आहे.

**<><><><><>**

पुणे महानगरपालिकेच्या एकंदर १६५ जागांपैकी भाजपा ५७, राष्ट्रवादी काँग्रेस १२, काँग्रेस १०, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष ३ जागांवर आघाडीवर आहेत. २ जागांवरचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत भाजपानं आघाडी घेतली आहे. १२८ जागांच्या महानगरपालिकेत भाजपा ७०, तर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसची युती ४० जागांवर आघाडीवर आहे.

१०२ सदस्यांच्या सोलापूर महानगरपालिकेत भाजपा ६०, तर ८१ सदस्यांच्या कोल्हापूर महानगरपालिकेत ६६ जागांचे निकाल स्पष्ट झाले आहेत. काँग्रेस २८, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष एका जागेवर विजयी झाला आहे. भाजपानं १९, शिवसेनेनं १४, राष्ट्रवादी काँग्रेसनं ३ आणि जनसुराज्य पक्षानं १ जागा जिंकली आहे.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या ६८ जागांपैकी, राष्ट्रवादी २७, भाजपा २५, शिवसेना १०, काँग्रेस २, एमआयएम २, बसपा १ आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष एका जागेवर आघाडीवर आहे.

इचलकरंजी महानगरपालिकेच्या ६४ जागांपैकी भाजपा ४३, महाविकास आघाडी पुरस्कृत शिव-शाहू विकास आघाडी १७, शिवसेना ३, ठाकरेंची शिवसेना १, तर राष्ट्रवादी काँग्रेस १ जागेवर आघाडीवर आहे.

सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेत ७८ पैकी २८ जागांवर भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस ९, काँग्रेस ८, शिवसेना १, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष एका जागेवर आघाडीवर आहे.

<><><><><>

**नाशिक**मध्ये आतापर्यंत २१ जागांवर निकाल घोषित झाले आहेत. भाजप ११ जागांवर विजयी झाला असून शिवसेना ८ जागांवर विजय मिळवला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला एका जागेवर विजय मिळवता आला आहे.

**मालेगाव** महापालिकेच्या ८४ जागांपैकी ४९ जागांचे निकाल जाहीर झाले आहेत. इस्लाम पार्टीला सर्वाधिक १९ जागांवर विजय मिळवला असून शिवसेनेला १८ जागांवर विजय मिळाला आहे. याशिवाय समाजवादी पार्टीने ५, एमआयएमने ४, भाजपने दोन जागांवर तर काँग्रेसने एका जागेवर विजय मिळवला आहे.

**धुळे** महानगरपालिकेच्या ७४ जागांपैकी ३३ जागांवर भाजपचे उमेदवार तर तीन जागांवर शिवसेनेचे उमेदवार विजयी झाले आहेत. चार जागांवर एमआयएमचे उमेदवार विजयी झाले आहेत.

**जळगाव** महापालिकेत भाजपाला ४६ तर शिवसेनेला २२ जागांवर विजय मिळाला आहे.

**छत्रपती संभाजीनगर**मध्ये ११५ जागांपैकी ८९ जागांचे कल जाहीर झाले असून त्यात ४९ जागांवर भाजप आघाडीवर आहे. शिवसेना १३ जागांवर आघाडीवर असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष एका जागेवर आघाडीवर आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ६ तर, एमआयएमचे उमेदवार १६ जागांवर तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष एका ठिकाणी आघाडीवर आहे. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार ४

जागांवर आघाडीवर आहेत. पालकमंत्री संजय शिरसाठ यांचा मुलगा सिद्धांत शिरसाठ आणि मुलगी हर्षदा शिरसाठ आपापल्या प्रभागात विजयी झाले आहेत.

**लातूर** महापालिकेत काँग्रेस आणि वंचित बहुजन पक्षाने आघाडी केली होती. या दोन्ही पक्षांचे मिळून ४७ उमेदवार विजयी झाले असून त्यापैकी ४३ काँग्रेसचे तर ४ वंचितचे उमेदवार आहेत. भारतीय जनता पार्टीला २२ जागी विजय मिळाला असून राष्ट्रवादी काँग्रेसचा फक्त १ उमेदवार विजयी झाला आहे.

**परभणी** महापालिकेत शिवसेना उद्धव बाळासाहेब पक्षाचे उमेदवार २३ जागांवर आघाडीवर असून काँग्रेस १२ जागांवर आघाडीवर आहे. भाजपचे उमेदवार १३ जागांवर तर राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार १० जागांवर आघाडीवर आहेत.

**जालना** महापालिकेत भाजपला ३७ जागांवर आघाडी मिळाली असून शिवसेना १२ जागांवर आघाडीवर आहे. काँग्रेस ९ जागांवर आघाडीवर आहे. पत्रकार गौरी लंकेश हत्या प्रकरणातला आरोपी श्रीकांत पांगारकर हा प्रभाग क्रमांक १३मधून अपक्ष म्हणून विजयी झाला आहे.

**<><><><><>**

**नागपूर** महानगरपालिकेच्या एकूण १५१ जागांपैकी भाजपा ७४ जागांवर आघाडीवर असून काँग्रेसच्या उमेदवारांनी ३८ जागांवर आघाडी घेतली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस ७ तर शरद पवार यांचा पक्ष ६ जागांवर आघाडीवर आहेत. उद्धव ठाकरे यांच्या पक्षानं ५ जागांवर आघाडी घेतली आहे. नागपूर महानगर पालिका निवडणुकीत आम आदमी पार्टीचेही ६ उमेदवार आघाडीवर आहेत. एम आय एम आणि मनसे एक एका जागेवर आघाडीवर आहेत

**अमरावती** महानगरपालिकेच्या एकूण ८७ जागांपैकी काँग्रेस ३७ जागांवर आघाडीवर आहे. तर भाजपा १४ जागांवर आघाडीवर आहे. बहुजन समाजवादी पार्टी, युवा स्वाभिमानी पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांचे प्रत्येकी ३ उमेदवार आघाडीवर आहेत. उद्धव ठाकरे पक्षाचा एक उमेदवार आघाडीवर आहे. एमआयएम पक्षानं ९ जागांवर आघाडी घेतली आहे.

**अकोला** महानगरपालिकेच्या एकूण ८० जागांपैकी भारतीय जनता पार्टीनं २२ जागांवर विजय मिळवला असून काँग्रेसनं ६ जागांवर विजय मिळवला आहे. शिवसेना उद्धव ठाकरे एका जागेवर तर शिवसेनेनं एका जागेवर विजय मिळवला आहे. राष्ट्रवादी

शरद्चंद्र पवार पक्ष ४ तर अजित पवार गट २ जागांवर आघाडीवर आहे. वंचित बहूजन आघाडीचे ५ उमेदवार विजयी झाले आहेत.

**चंद्रपूर** महानगरपालिकेच्या ६६ जागांपैकी १२ जागांवर भाजपा विजयी झाला असून काँग्रेसनं जनविकास पक्षासह एकूण १५ जागांवर विजय मिळवला आहे. उद्धव ठाकरे यांच्या पक्षालाही ५ जागा मिळाल्या आहेत. अन्य पक्षांचे ३ उमेदवार विजयी झाले आहेत.

<><><><><>

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीत झालेल्या मतदानाची अधिकृत आकडेवारी आज राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केली. सर्व २९ महानगरपालिकांमधे मिळून सरासरी ५४ पूर्णांक ७७ शतांश टक्के मतदान झालं. सर्वात जास्त मतदान इचलकरंजी महानगरपालिकेत ६९ पूर्णांक ७६ शतांश टक्के झालं. त्या खालोखाल कोल्हापूरमधे ६६ पूर्णांक ५३ शतांश टक्के तर परभणीत ६५ पूर्णांक ९९ शतांश टक्के मतदान झालं.

मीरा भाईंदरमधे मतदानाचं प्रमाण सर्वात कमी, ४८ पूर्णांक ६४ शतांश टक्के राहिलं.

<><><><><>

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीच्या निकालांचं विश्लेषण करणारा विशेष कार्यक्रम ‘निवाडा महानगरांचा’, आकाशवाणी मुंबईच्या प्रादेशिक वृत्त विभागातर्फे सादर करण्यात येणार आहे. आज रात्री ८ वाजून १० मिनिटांपासून हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल. दररोज रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणारं राष्ट्रीय बातमीपत्र आज रात्री ८ वाजता प्रसारित होईल.

<><><><><>

स्टार्ट अप अभियानाने गेल्या १० वर्षांमधे क्रांती घडवून आणली असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. राष्ट्रीय स्टार्टअप दिनानिमित्त नवी दिल्लीत भारत मंडपम् इथं आयोजित कार्यक्रमात आज ते बोलत होते. प्रत्यक्ष समस्यांना भिडण्याचं उद्दिष्ट युवकांनी ठेवलं असून त्यांच्या स्वप्नांचा प्रवास या दहा वर्षात अनुभवला असल्याचं ते म्हणाले.

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल यांनी सांगितलं की २०१६ मधे ही मोहीम सुरु झाली त्यावेळी अवघे ४०० स्टार्टअप होते, ती संख्या आता दोन लाखांवर गेली आहे. या कार्यक्रमात  प्रधानमंत्र्यांनी स्टार्ट अप उद्योजकांशी संवाद साधला.

स्टार्ट अप संकल्पना कार्यान्वित झाल्याच्या दशकपूर्तीनिमित्त या विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. १६ जानेवारी २०१६ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या उपक्रमाचा प्रारंभ केला होता. नवोन्मेषाला चालना, उद्योजकतेला प्रोत्साहन आणि गुंतवणूक-आधारित विकास हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. २०१४ नंतर दीड लाखापेक्षा जास्त नवीन उपक्रम सुरु झाले, सुमारे साडे १७ लाख रोजगारनिर्मिती झाली असून, भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची स्टार्टअप परिसंस्था ठरला आहे.

//<><><><><>//